## स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)
## योजनेची संक्षिप्त माहिती

### 1) वैयक्तिक शौचालय -

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-2 अंतर्गत ग्रामीण भागातील कुटुंबांना वैयक्तिक शौचालय बांधकाम करण्यासाठी प्रवृत्त करणे व त्याचा वापर करण्यासाठी त्यांची क्षमता बांधणी करणे ,त्याची शाश्वता राखणे,गावातील सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनमध्ये शोषखड्डा व खत खड्डा यांचे बांधकाम करणे,प्लास्टिक कचरा गोळा करणे,शाळा व अंगणवाडी तसेच महत्वाच्या सर्व सार्वजनिक संस्थांमध्ये व ठिकाणांची स्वच्छताविषयक सोयी सुविधा उपलब्ध करून देणे, गांव स्वच्छ ठेवणे ई. कामांचा समोवेश आहे.उपरोक्त सर्व सुविधांमुळे ग्रामीण भागातील लोकांचे आरोग्यमान उंचावणे व त्यांना अस्वच्छतेमुळे होणा-या आजारांपासून मुक्त ठेवणे हे मुळ उद्दीष्ट आहे.

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-2 अंतर्गत ग्रामीण भागातील पात्र कुटुंबांना वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी शासनाकडून प्रोत्साहनपर अनुदान म्हणून 12000/- (बारा हजार रूपये फक्त ) एवढा अनुदान मिळतो. या योजनेचा लाभ पुढील प्रवर्गातील पात्र कुटुंबांना प्राप्त होते — जसे की,

**अ. APL (Above Poverty Line) -**

1. अनुसूचीत जाती (**SC**)
2. अनुसूचीत जमाती (**ST**)
3. अल्पभूधारक शेतकरी (**Small & Marginal Farmer**)
4. भूमिहिन (**Landless**)
5. अपंग (**Handicap**)
6. महिला प्रधान कुटुंब (**Women Headed Family**)

**ब. BPL (Below Poverty Line) -**

1. अनुसूचीत जाती (**SC**)
2. अनुसूचीत जमाती (**ST**)
3. सर्वसाधारण (**General**)

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-2 अंतर्गत पात्र कुटुंबांना वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी प्रोत्साहनपर अनुदान प्राप्त करण्यासाठी लागणारे कागदपत्र खालील प्रमाणे आहेत —

1. लाभार्थी कडे वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी जागा उपलब्ध असल्याचे प्रमाणपत्र.
2. शौचालय बांधकाम पूर्णत्वाचा दाखला.
3. ग्रामपंचायत चे प्रस्ताव -
4. यापूर्वी कुठल्याही योजनेतून अनुदान न घेतल्याचे प्रमाणपत्र.
5. ग्रामपंचायतचे नमुना नं.8 चा उतारा.
6. उपयोगीता प्रमाणपत्र (लाभार्थीकडे शौचालयासाठी पाणी उपलब्ध आहे व तो शौचालयाचा वापर करीत असल्या बाबत)
7. **SBM** च्या केंद्र संकेतस्थळावर लाभार्थीचे नांव नोंद असलेला ऑनलाईन क्रमांक.
8. शौचालय बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र व वैयक्तिक शौचालयाचे लाभार्थी सहित कलर फाटोची प्रत.
9. हमीपत्र — जर यापूर्वी कुठल्याही योजनेतून अनुदान घेतले असतील तर सदरील रक्कम लाभार्थी कडून कायदेशीर परत घेण्यासाठीचे हमीपत्र.

## 2) सार्वजनिक शौचालय -

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-2 अंतर्गत ग्रामीण भागातील बसस्थानक, बाजाराचे ठिकाण, देवस्थान व यात्रा या ठिकाणी सार्वजनिक शौचालय देण्याची सुविधा या योजने अंतर्गत करण्यात आलेली आहे. हा लाभ घेण्यासाठी ग्राम पंचायतीच्या वतीने जागा उपलब्ध असल्याचे ना हरकत प्रमाणपत्रासह प्रस्ताव जिल्हा कक्षास सादर करावा लागतो. सार्वजनिक शौचालय हे एकूण तीन लाख रुपयांचे असून यात स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-2 अंतर्गत दोन लाख दहा हजार रुपये तर 15वा वित्त आयोगांतर्गत नव्वद हजार रुपयांची तरतूद केली जाते.

## 3) घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन -

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-2 अंतर्गत हागणदारीमुक्तीच्या दुस-या टप्प्यात गावे हागणदारीमुक्त अधिक (**ODF PLUS**) करण्यासाठी शौचालयासह गावस्तरावर घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन असणे आवश्यक आहे. यासाठी गावस्तरावरील लोकसंख्या व कुटुंबसंख्येनूसार घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाचे आराखडे तयार केले जातात. या कामासाठी स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-2 अंतर्गत 70% हिस्सा तर 15वा वित्त आयोगातून 30% निधी उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे.